
तिरंगा टी सेंटर

लोकमंथन

# फलटण येथे ज्येष्ठ नागरिका, हो जागा; पथनाट्याचे सादरीकरण



**फलटण / प्रतिनिधी :** सातारा जिल्हा विधी सेवा समितीच्या वतीने विधी दिनानिमित्त फलटण येथील प्रियदर्शिनी ज्ञान प्रबोधिनी विधी महाविद्यालयाच्या वतीने डॉ आंबेडकर चौक फलटण येथे ज्येष्ठ नागरिका, हो जागा या विषयाला अनुसरून पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी फलटण वकील संघाच्या वतीने मोटारसायकल रॅलीतून जनजागृती करण्यात आली.

कायद्याच्या अभ्यासकांनी पथनाट्याच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांवर होणारे अन्याय अत्याचार प्रात्यक्षिकपणे दाखवून त्यांच्या मूलभूत अधिकारांविषयी माहिती देण्यात आली. परिसरात जमलेल्या प्रचंड जनसमुदायाने या कार्यक्रमाला उत्साहात प्रतिसाद दिला.

यावेळी प्राचार्य अमित मोरे, प्रा. डॉ. निता घाडगे यांच्या मार्गदर्शनाने आकाश आढाव, वैष्णवी घाडगे, गौरी जगदाळे, जयवंत काकडे, रमजान मुल्ला व इतर विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. त्याबद्दल त्यांचे अनेक स्तरांतून कौतुक होत आहे.

